## पद्यापाठ-१३

## बाया पाण्याशीच बोलतात

## ठळक मुद्दे

- **कवी –**अजय कांडर
- **कवितेचा आशय-**पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या स्त्रियांच्या अवस्थेचे वर्णन
- **कवितेतील भाव व भाषासौंदर्य-**चित्रदर्शी वर्णन,सूचकता व उपमा अलंकाराचा परिणामकारक वापर
- **कवितेचे वैशिष्ट्य-**अंर्तगत लय असलेले गद्यकाव्य
- **उपक्रम-**कविता सादरीकरण,संवाद लेखन,कल्पनाप्रधान निबंध लेखन
- **पूरक वाचनासाठी समांतर कविता-**वाचन,साम्यभेद शोधन

**प्रस्तावना:**

उन्हाळा आला की खेड्यापाड्यात पाण्याची टंचाई जाणवायला लागते. त्यातून त्या वर्षी पाऊस कमी झाला असेल,दुष्काळ पडलेला असेल तर पिण्याच्या पाण्यासाठीही वणवण भटकावे लागते. बहुतेक वेळा हे काम घरातल्या स्त्रियांना करावे लागते. अशावेळी त्यांची जी अवस्था होते त्याचे चित्रण कवी अजय कांडर यांनी केले आहे. (कविता श्राव्य आणि लिखित)

<u>बाया पाण्याशीच बोलतात</u>

एक घागर भरत नाही, दुसरी रिकामीच, तरी रांगाच रांगा जातात वाढत
बाया झऱ्यापाशी उभ्या; आटत चाललेल्या धारेसारख्या तुटक बोलत.
डुंगलीतील झरा वाचवू पाहतोय जीव; तिथे सर्वांचेच प्राण तहानलेले
चढणीचा घाट चढून उतरून बायांच्या पायात गोळे आणि डोळे ओले.
सुकून जावा कोंब तसा वाळून गेला जीव, सोसून उन्हाच्या झळा
थेंबाथेंबानेच पाणी त्या करू पाहतात आपल्याशी गोळा.
किती वाढत जातो उन्हाळा झऱ्यावरच पहारा ठेवताना
दिवसरात्र बाया पाण्याशीच बोलतात; झरा मुका होत जाताना.

## Template 3

**कवितेतील आशय:-**

पाण्याच्या शोधात काही बायका डोंगर कपारीतल्या एका लहानश्या झऱ्याशी आलेल्या आहेत. त्यांच्या घागरी भरता भरत नाहीत आणि रांगा मात्र वाढत चालल्या आहेत. बायका तुटक तुटक बोलताहेत घाट चढून आल्यामुळ त्यांच्या पायात गोळे आलेत.उन्हाच्या झळांमुळे त्या तहानलेल्या आहेत त्यांच्या डोळयात पाणी आहे पण जीव सुकून गेलाय. त्यांना थेबाथेबानं पाणी गोळा करायचं आहे त्यासाठी त्या झऱ्यावर पहारा करताहेत आणि पहारा करता करता पाण्याशीच बोलताहेत ते पाणी देणारा झरा मात्र हळूहळू मुका होत जातो.

**कवितेतील भावसौंदर्य व भाषासौंदर्य:-**

डोंगरकपारीत एक लहानसा झरा.त्याच्या पुढच्या घागरीच्या आणि बायकाच्या रांगांच्या दृश्याचे वर्णन कवीने या कवितेत केलेले आहे. एका अर्थाने कवीने आपल्या शब्दांत रेखाटलेले हे एक प्रसंगचित्र आहे.पण आपण कविता वाचतो तेव्हा त्यातील बायकांचे शारीरिक कष्ट आणि मानसिक घालमेल आपल्याला तीव्रतेने जाणवते.म्हणजे कवीच्या मनातील भावना या कवितेतून वाचकापर्यंत पोचतात हेच या कवितेचे भावसौंदर्य आहे.

**दुष्काळ,पाणीटंचाई** हे शब्द या कवितेत कुठेही आलेले नाहीत. तरीही एक घागर भरत नाही दुसरी रिकामीच तरी रांगाच रांगा जातात वाढत. कवितेच्या पहिल्याच ओळीतून या समस्येची तीव्रता आपल्याला जाणवते.

पाणी मिळवण्यासाठी चढणीचा रस्ता चढून झऱ्यापाशी आलेल्या बायकांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीचे वर्णन करण्यासाठी कवीने या प्रतिमा निवडल्या आहेत त्या बघा- बायकांचं बोलणं आटत चाललेल्या झऱ्यासारखं सुकं आहे किवा सुकलेल्या कोंबासारखं. त्याचा जीव वाळून गेलाय. बायकांच्या स्थितीची तुलना करण्यासाठी आटत चालेला झरा, सुकलेला कोंब यांचा वापर दुहेरी परिणाम करतो.दुष्काळाचा परिणाम आणि बायकांच्या हालअपेष्टा या दोन्हीही गोष्टी त्यातून तीव्रतेने पुढे येतात.

**भाषासौंदर्य**

चढण चढून आल्यामुळे बायकांच्या पायात गोळे येणं,त्यांचे प्राण तहानलेले असणं, थेंबाथेंबानी पाणी गोळा करु पाहणं, त्यासाठी झऱ्यावर पहारा करता करता पाण्याशी बोलणं या साऱ्या वर्णनातून दुष्काळाचे आणि पाण्यासाठी बायकाच्या होणाऱ्या घालामेलीचे चित्र अधिक गडद होत जाते.तुलनेसाठी अतिशय अर्थपूर्ण अशा प्रतिमा निवडल्यामुळे कवितेला एक प्रकारचे अर्थ सौंदर्य प्राप्त होते.अशीच आणखीन काही उदाहरणे तुम्हाला तुम्ही वाचलेल्या इतर कवितामधेही सापडतील.त्यांचा शोध घ्या.त्यामुळे तुम्हाला एखादी कविता अधिक चांगली का असते हे समजायला लागेल शिवाय या कवितांचा अधिक आनंद घेता येईल.

**उजळणी प्रश्न:**

**प्रश्न १-पुढील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत द्या**

१)या कवितेत दुष्काळी परिस्थितीचे वर्णन आहे हे कोणत्या ओळीवरून समजते?स्पष्ट करा.

२)पाण्यासाठी वणवण करणाऱ्या बायकांच्या बद्दल कवीच्या मनात कोणत्या भावना आहेत असे तुम्हाला वाटते?

**प्रश्न २-संदर्भासह स्पष्टीकरण करा**

१)चढणीचा घाट चढून उतरून बायांच्या पायात गोळे आणि डोळे ओले

२)सुकून जावा कोंब तसा वाळून गेला जीव

**प्रश्न ३-पुढील ओळीमधील अव्यये ओळखा व त्यांचे प्रकार लिहा**

१)बाया झऱ्यापाशी उभ्या

२) सुकून जावा कोंब तसा वाळून गेला जीव

३) झऱ्यावरच पहारा ठेवताना

**प्रश्न ४- पुढील ओळींमधे आलेले भाषिक अलंकार ओळखा व लिहा.**

१)आटत चाललेल्या धरेसारख्या तुटक बोलत.

२) सुकून जावा कोंब तसा वाळून गेला जीव.

**Template 8**

मुक्त प्रश्न

१)पुढे दिलेल्या कविता काळजीपूर्वक ऐका. ऐकताना या तीनही कवितांच्या लयीत तुला काय फरक जाणवला ?हा फरक कशामुळे पडत असेल ?

१)प्राणसई-इंदिरा संत २)पांगलेला पावसाळा-ना.धों महानोर ३)बायका-अरुणा ढेरे (निरंजन)

**प्राणसई**

इंदिरा संत

‘पीठ कांडते राक्षसी

तसे कडाडते ऊन

प्राणसई घनावळी

कुठे राहिली गुंतून?

दिला पाखरांच्या हाती

माझा सांगावा धाडून

येगं येगं घनावळी

मैत्रपणा आठवून!’

‘ये गं दौडत धावत
आधी माझ्या शेतावर
शेला हिरवा पांघर
मालकांच्या स्वप्नांवर!
तशी झुलत झुलत
ये गं माझिया घराशी
भाचे तुझे झोंबतील
तुझ्या जरीच्या घोळाशी!
आळे वेलाचे भिजू दे
भर विहीर तुडुंब

सारे घरदार माझे
भिजू दे गं चिंब चिंब!
उभी राहून दारात
तुझ्या संगती बोलेन
सखा रमला शेतात
त्याचे कौतुक सांगेन!’

‘कां ग वाकुडेपणा हा
कां ग अशी पाठमोरी
ये गं ये गं प्राणसई

वा-यावरून भरारी!’

## पांगलेला पावसाळा

ना. धो. महानोर

पांगलेला पावसाळा, वाट भरलेली धुळीने

मोडक्या फांदीस घरटे, वाळलेली शुष्क पाने

दुर गेल्या पायवाटा डोंगराच्या पायथ्याशी

पंखमिटल्या झोपड्यांचे दु:ख कवटाळे उराशी

फाल्गुनाचे पळसओल्या रक्त झडलेल्या फुलांचे

फाटक्या काळचा भुईला जहर डसलेल्या उन्हाचे

हे जिणे वर्षानुवर्षी, काजळी काळी पिकाला

पापण्याच्या कातळाशी खोल विझला पावसाळा.

## बायका

अरूणा ढेरे

भर माध्यान्ही

नदीवर खळबळून जातात,

चुबकून निघतात धुण्यागत बायका,

सुस्कारा टाकून पदरानं चेहरा पुसून घेतात.

ठावठिकाणा नसलेलं एखादं पाखरू

घालतं कधी निळीजांभळी थरथरीत शीळ

तेव्हा क्षणभर धाप टाकत उभ्या राहतात

ओल्या दु:खाचे पिळे होऊन घराकडे परतून येतात.

चुलीतल्या जाळाबरोबर

मग धगधगून उठतात बायका, तांबड्याबुंद होत जातात.

खमंग वासाच्या रांधपासारखे त्यांचे पापोडे

घरीदारी सुटत जातात,

तेव्हा माध्यान्हीची रगेल उन्हही

घराच्या ओसरीला येऊन थांबतात.

थकल्या-भागल्या दुपारी

बायका लवंडतात जराशा माजघरात

दमट अंधारी नीज होतात

खिडकीतून, दारातून झुळझुळ होतो वारा

तेव्हा इथे तिथे ठिणगी ठिणगी वीज होतात.

सांजेच्या डुचमळत्या पाण्यावर

उतरत्या उन्हाची लखलख,

बायका जर्द पितळी घागरी होतात

दुडीवर दुडी नदीकाठाशी लयीत जातात, लयीत येतात.

२) अजय कांडर यांची पाठ्यपुस्तकातील कविता व प्राणसई ही कविता या दोघामधे पाऊस एक समान धागा आहे.आणखीन अशा कोणकोणत्या गोष्टी या कवितांमधे समान आहेत असे तुला वाटते ?

३) अजय कांडर याच्या कवितेत झऱ्याजवळ उभे राहून पाण्याशी आणि आपसात काय बोलत असतील त्यांची कल्पना कर आणि त्याचा संवाद लिहून काढ.

४)एका गावातील बायकांना दरवर्षीच्या उन्हाळयात पाण्यासाठी वणवण भटकावे लागते.तू त्या गावाचा सरपंच झालास/झालीस तर या समस्येवर मात करण्यासाठी काय काय करशील ?